bluebytes
news that matters

लोकमत

Friday, February 19, 2010

**Continue the ban law against the tobacco**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Supplement: Helllo Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Bottom-Center, Width(cms): 12, Height(cms): 13, Size(sq.cms): 156

# तंबाखूविरोधी कायद्यावरील बंदी उठवू नये

**मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी)** - शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्रीवरील बंदीचा कायदा २००३ साली संसदेत मंजूर करण्यात आला होता. मात्र आता या कायद्याला अनेक लोकप्रतिनिधी विरोध करीत असल्याचे एक अहवालातून समोर आले आहे. छोटे व्यापारी आणि दुकानदारांची बाजू घेऊन काही खासदार अशी बंदी उठवण्याची मागणी पंतप्रधान कार्यालयाकडे करीत आहेत.

त्यामुळे याविरोधात आता ॲडव्होकसी फोरम फॉर टोबॅको कंट्रोल (एएफटीसी) ही संस्था उभी ठाकली आहे. तंबाखू नियंत्रणाकरिता आवश्यक कायदा, संशोधन, जनजागृती यासारख्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध ६१ स्वयंसेवी संस्थांची मिळून ही संस्था बनली आहे. खासदारांच्या दबावाखाली ही बंदी उठवण्याचा निर्णय घेतला जाऊ नये यासाठी या संस्थांमधील सदस्य एक झाले आहेत. त्यामुळेच सर्व एएफटीसी सदस्यांच्या वतीने पंतप्रधानांनाच एक पत्र पाठवण्यात येणार आहे. या पत्रावर हेलिस सेखसारिया संस्थेचे संचालक डॉ. प्रकाश गुप्ता यांच्यासह हृदय संस्थेचे श्रीनाथ रेड्डी, व्हीएचएआयचे अलोक मुखोपाध्याय आणि डॉ. मिरा यांच्या स्वाक्षऱ्या असणार आहेत.

याबाबत बोलताना हेलिसचे संचालक डॉ. प्रकाश गुप्ता म्हणाले की, तंबाखू वापराच्या गंभीर परिणामांचा विचार करून १६८ देश जागतिक आरोग्य संघटनेच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑफ टोबॅको कंट्रोलचे (एफसीटीसी) सदस्य बनले. २००७ मध्ये या कराराला मान्यता देणारा भारत हा सातवा देश होता. एफसीटीसीच्या कलम

## एएफटीसीचे पंतप्रधानांना पत्र

१६.१ बीची तरतूद शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्रीवर बंदी घालून पूर्ण करण्यात आली. मात्र आता तंबाखूमुळे मिळणाऱ्या उत्पन्नामुळे देशातील खासदारांचे लक्ष विचलित होत आहे. तंबाखूच्या वापरामुळे आरोग्य, अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि एकंदरीतच समाजावर कोणते विपरीत परिणाम होतात याचा खासदारांना विसर पडत चालल्याने शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्रीची बंदी उठवावी, अशी मागणी ते करीत आहेत.

आज तरुणांमध्ये तंबाखूचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. ग्लोबल यूथ टोबॅकोने केलेल्या सर्वेक्षणानुसार देशातील १४ टक्क्यांपेक्षा जास्त तरुण कोणत्या ना कोणत्या प्रकारे तंबाखूचा वापर करतात. तंबाखू उद्योगाने नेहमीच तरुणांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे तरुणांना त्यातही शाळकरी मुलांना तंबाखू उत्पादने सहजासहजी उपलब्ध होऊ नयेत यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज असल्याने शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू बंदीचा निर्णय योग्यच असल्याचेही डॉ. गुप्ता यांनी सांगितले.

जगभरात दरवर्षी ५.४ लाख लोक तंबाखू सेवनाने मृत्युमुखी पडतात. त्यापैकी ७० टक्के मृत्यू विकसनशील देशांमध्ये होतात. भारत हा तंबाखूचा सर्वांत मोठा उत्पादक आणि ग्राहक आहे. भारतात तंबाखूचे सेवन करणाऱ्यांची संख्या सतत वाढत आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार देशातील ११ टक्के महिला आणि ५७ टक्के पुरुष तंबाखूचे सेवन करतात. जगातील धूम्रपान करणाऱ्यांपैकी १७ टक्के लोक भारतात आहेत. तसेच येत्या वर्षांत एक दशलक्ष लोकांचा देशात तंबाखू सेवनामुळे मृत्यू होईल, अशी शक्यताही वर्तवण्यात आली आहे, असेही डॉ. गुप्ता म्हणाले.